नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २७३ | Issue - 273 | वार बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२५ | Blow- Wednesday Date 19 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## व्यापार दुप्पट करण्यावर सहमती

### पंतप्रधान मोदी, कतारचे अमिर यांची महत्त्वपूर्ण द्विपक्षीय चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत आणि कतारदरम्यानचा द्विपक्षीय व्यापार पुढील पाच वर्षांमध्ये दुप्पट करून २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य मंगळवारी निर्धारित करण्यात आले. तसेच दोन्ही देशांदरम्यानचे संबंध सामरिक भागीदारीच्या स्तरापर्यंत उंचावत असल्याचेही जाहीर करण्यात आले.

कतारचे अमिर शेख तमिम बिन हमाद अल-थानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे महत्त्वपूर्ण द्विपक्षीय चर्चा झाली. त्यावेळी दोन्ही नेत्यांदरम्यान व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि सामान्य जन-तेचा आपापसातील संपर्क यावर लक्ष केंद्रित करून द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करण्याचा निर्धार करण्यात आला.

भारत आणि कतारदरम्यान मंगळवारी दोन करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. एक करार साम रिक भागीदारी करण्याविषयी आहे आणि दुसरा सुधारित दुहेरी कर टाळण्याचा करार आहे. त्याशिवाय आर्थिक भागीदारी मजबूत करणे, अभिलेखागारांचे व्यवस्थापन आणि युवा व्यवहार व क्रीडा प्रकारांमध्ये सहकार्य याविषयी पाच सामंजस्य करारही करण्यात आले. भारत व कतारदरम्यानचा सध्याचा द्विपक्षीय व्यापार १४ अब्ज डॉलर इतका असून तो पुढील पाच वर्षांमध्ये २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य पंतप्रधान म ोदी आणि कतारचे अमिर यांनी निश्चित केल्याचे चॅटर्जी म्हणाले. पंतप्रधान मोदी यांच्या गेल्या वर्षीच्या कतार भेटीत भारताने कतारमधून पुढील २० वर्षे एलएनजी आयात करण्याचा ७८ अब्ज डॉलरचा करार केला होता. सामरिक भागीदारी करारामुळे दोन्ही देशांदरम्यानचे सध्याचे द्विपक्षीय संबंध सामरिक स्तरापर्यंत उंचावणार आहेत. व्यापार, ऊर्जा सुरक्षा तसेच प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर सहकार्य अधिक दृढ करण्यावर आम चा भर आहे. - अरुण कुमार चॅटर्जी, सचिव, परराष्ट्र मंत्रालय भविष्यामध्ये द्विपक्षीय मुक्त व्यापार करार (एफटीए) करण्यासाठी पंतप्रधान मोदी आणि



कतारचे अमिर यांच्यादरम्यान चर्चा झाली अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सध्या भारत आणि आखात सहकार्य परिषदेदरम्यान (जीसी-सी) 'एफटीए'साठी वाटाघाटी सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. 'जी-सीसी'मध्ये संयुक्त अरब अमिराती, बहारिन, सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि कुवैत या देशांचा समावेश आहे. भारत व कतारही 'एफटीए'ची शक्यता पडताळून पाहत आहेत.

## थोडक्यात...




### उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवण्यासाठी मुदतवाढ

मुंबई : उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवण्यासाठी परिवहन विभागाने अंतिम मुदतीत एक महिन्याची वाढ केली आहे.

एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित केलेल्या वाहनांना मार्च २०२५ पर्यंत उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवण्याच्या सूचना परिवहन विभागाने केल्या होत्या. मात्र, संकेतस्थळावर तांत्रिक बाबींमुळे वाहनधारकांना अडचणी येत होत्या. त्यामुळे पाटी (एचएसआरपी) बसवण्यात विलंब होत होता. वाहनधारकांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, अंतिम मुदतीत एक महिन्याची वाढ केली. त्यामुळे आता ३० एप्रिल २०२५ पर्यंत पाटी बसवण्यास परवानगी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु, वाहनधारकांनी याला फारसा प्रतिसाद दिला नाही. तसेच, अनेकांना ही प्रक्रिया पूर्ण करण्यात अजूनही अडचणी येत आहेत. सुमारे एक कोटी वाहनधारकांनी अद्याप अनिवार्य पाट्या बसवल्या नसल्यामुळे एक महिन्याची मुद-तवाढ देण्यात आली आहे. अंतिम मुदत वाढवण्याचा निर्णय वाहनधारकांना फायदेशीर ठरेल. १ एप्रिल २०१९ नंतर खरेदी केलेल्या वाहनांवर उत्पादकामार्फत एचएसआरपी पाटी बसविण्यात आल्यामुळे अशा वाहनधारकांना पुन्हा ती बसवण्याची आवश्यकता नाही.

## राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग अखेर कार्यान्वित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोगाच्या अध्यक्षांसह सचिव आणि दोन सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे, हा आयोग कार्यान्वित झाला आहे, असे राज्य सरकारने मंगळवारी सांगितल्यानंतर उच्च न्यायालयाने यासंदर्भातील जनहित याचिका निकाली काढली.

आयोगाच्या अध्यक्षांसह सचिव आणि दोन सदस्यांची पदे भरताना आवश्यक पात्रतेच्या निकषांचे पालन केले गेले नाही, असा दावा करून याचिकाकर्त्यांनी त्याला आक्षेप घेतला. तसेच, याचिका निकाली काढू नये, अशी विनंती न्यायालयाला केली. परंतु, याचिकाकर्त्याला सदस्यांच्या पात्रतेचा मुद्दा स्वतंत्रपणे उपस्थित करण्याची मुभा आहे, असे स्पष्ट करून मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने जनहित याचिका निकाली काढली.

**राज्य सरकारची उच्च न्यायालयात माहिती**

डिसेंबर २०२० पासून आयोग कार्यान्वित नसल्याचा मुद्दा खेडस्थित सागर शिंदे यांनी जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला होता. आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांची पदे २०२२ पासून रिक्त असल्याने प्रकरणे प्रलंबित असल्याची न्यायालयानेही गंभीर दखल घेतली होती. तसेच, ही पदे अद्याप रिक्त का, अशी विचारणा करून राज्य सरकारला त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते. त्या पार्श्वभूम ीवर, २४ सप्टेंबर रोजीच्या आदेशान्वये आयोगाच्या अध्यक्ष, सचिवपदासह दोन सदस्यांची पदे भरण्यात आल्याची माहिती राज्य सरकारने दिली. दरम्यान, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (अॅट्रोसिटी) तक्रार नोंदवली म्हणून आपल्याला औषधालय चालवण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा याचिकाकर्त्याने याचिकेद्वारे केला होता. तक्रारीची दखल खेड पोलिसांनी काही महिन्यांनंतर घेतली आणि गुन्हा नोंदवला. त्यामुळे, पोलिसांच्या कारभाराविरोधात आपण सप्टेंबर २०२३ मध्ये अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे धाव घेतली. मात्र, आयोगानेही आपल्या अर्जावर सुनावणी घेतली नाही. त्यामुळे, माहिती अधिकारांतर्गत अर्ज करून आपण त्याबाबत माहिती मागवली होती. त्यावेळी, डिसेंबर २०२२ पासून आयोगापुढे ८७७ प्रकरणे प्रलंबित असल्याचे उघड झाले, असा दावा शिंदे यांनी याचिकेत केला होता.

## 'सेन्सेक्स' पुन्हा घसरणपंथाला, बाजार भांडवल घसरून ४०० लाख कोटींखाली


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : निरंतर गटांगळ्या खात असलेल्या मुंबई शेअर बाजारातील सूचिबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल मंगळवारी प्रथमच ४०० लाख कोटी रुपयांच्या खाली घसरले असून, सेन्सेक्सने एक दिवसापुरती सकारात्म कता दाखवून पुन्हा घसरणीचा क्रम सुरू ठेवला. परिणामी बाजारात मागील दहापैकी सलग आठ सत्रात झालेली उतरंड पाहता मंदीवाल्यांनी बाजाराचा ताबा घेतल्याचेच दाखवून दिले आहे.

मुंबई शेअर बाजारातील सर्व कंपन्यांचे बाजार भांडवल याआधी ४ जून २०२४ मध्ये ३९४ लाख कोटी रुपयांवर होते. आता निरंतर घसरणीनंतर मंगळवारी ते ३९८ लाख कोटी रुपयांपर्यंत खाली आले आहे.मुख्यतः परदेशी निधीचे निर्गमन आणि कंपन्यांच्या अपेक्षेपेक्षा कमकुवत मिळकत कामगिरीमुळे भांडवली बाजारात गुंतवणूकदारांमध्ये निराशेचे वाता-वरण आहे. परिणामी प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स मंगळवारच्या सत्रात पुन्हा ७६,००० अंशांच्या पातळीखाली घसरला आहे.

मंगळवारच्या सत्रात मुंबई शेअर बाज-ाराचा निर्देशांक सेन्सेक्स २९.४७ अंशांनी घसरून ७५,९६७.३९ पातळीवर बंद झाला. दिवसभरातील सत्रात त्याने ४६५.८५ अंश गमावत ७५,५३१.०१ या सत्रातील नीचांकी पातळीला स्पर्श केला. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्ये १४.२० अंशांची किरकोळ घसरण झाली आणि तो २२,९४५.३० पातळीवर स्थिरावला. निफ्टीला सत्रात २३,००० अंशांची पातळी देखील गाठता आली नाही.

परदेशी गुंतवणूकदारांच्या अर्थात एफआयआयच्या देशांतर्गत भांडवली बाज-




ारातून होणाऱ्या निर्गमनामुळे चिंता वाढली आहे. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपयात मोठी घसरण सुरूच आहे, परिणामी चलना-वर दबाव असल्याने देशांतर्गत बाजारात गुंतवणूकदार नफावसुलीला प्राधान्य देत आ-हेत. तर दुसरीकडे काही गुंतवणूकदार बाजार तळाला पोहोचल्याने खरेदी देखील करत आ-हेत. मूल्यांकनांबद्दल चिंतेमुळे व्यापक बाज-ाराचे प्रतिनिधित्व करणारे स्मॉल आणि मिडकॅप कंपन्यांच्या समभागांमध्ये घसरण सुरू आहे. दरम्यान, देशांतर्गत चलनाचे अवमूल्यन आणि वाढत्या कमॉडिटी किमतींमुळे आयात मूल्य वाढले आहे. त्या परिणामी भारताची व्यापार तूट अपेक्षेपेक्षा अधिक वाढली आहे, असे मत जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले.

सेन्सेक्समध्ये, इंडसइंड बँक, महिंद्र अँड महिंद्र, अल्ट्राटेक सिमेंट, हिंदुस्तान युनिलिव्हर, सन फार्मा, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, आयटीसी आणि एशियन पेंट्सच्या समभागात सर्वाधिक घसरण झाली. तर एनटीपीसी, झोमॅटो, टेक महिंद्र, पॉवर ग्रिड, कोटक महिंद्र बँक आणि एचसीएल टेकचे समभाग तेजीसह स्थिरावले. मुंबई शेअर बाजाराच्या आकडेवरीनुसार, सोमवारी परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) ३,९३७.८३ कोटी रुपये मूल्याच्या समभागांची विक्री केली.

## शिवजयंतीनिमीत्त महाराष्ट्रासह आज देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. शिवप्रेमी यानिमित्ताने विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करतात. ढोल-ताशाच्या गजरात मिरवणुका काढल्या जा-तात, महाराजांच्या गड-किल्ल्यांचं संवर्धन व्हावं यासाठी तरुणपिढीला मार्गदर्शन केलं जातं. अशाप्रकारे हा शिवजयंती उत्सव विविध भागात साजरा केला जातो. याशिवाय स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडावर सुद्धा विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. याठिकाणी शिवप्रेमींसह बरेच म ान्यवर शिवजयंतीला उपस्थित असतात. शिवजयंतीनिमीत्त कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार उपस्थित राहाणार आहेत.

## महाराष्ट्रात दोन लाख बांगलादेशींना भारतीय बनवण्याचा घोटाळा : किरीट सोमय्यांचा दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोला : महाराष्ट्रात दोन लाख बांगलादेशींना भारतीय बनवण्याच्या घोटाळ्याचा पर्दाफाश केला आहे, असा दावा भाजप नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आज येथे केला. या प्रकरणात आठ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले असून ३०० च्यावर आरोपींची चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

उशिरा जन्म व मृत्यू नोंदणी प्रकरणात किरीट सोमय्या यांनी आक्रमक पवित्रा घेतला. अकोला, अमरावती जिल्ह्यात बनावट कागदपत्रांद्वारे जन्म प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणात आज किरीट सोमय्या यांनी अकोल्यातील रामदासपेठ व पातूर पोलीस ठाण्यात भेट देऊन प्रकरणाची माहिती घेतली. यावेळी किरीट सोमय्या यांनी पोलिसांकडे काही कागदपत्रांचे पुरावे देखील सादर केले आ-हेत. त्यानंतर त्यांनी (पान २ वर...)

### काँग्रेसला राज्यात गतवैभव मिळवून देणार

### नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा निर्धार

## भाजप सक्षम नसल्यानेच शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला फोडावे लागले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मतदारांच्या नावाच्या चिठ्ठ्या वाटणारा कार्यकर्ता, जिल्हा परिषद सदस्यापासून ते आता काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी आपल्यावर सोपविण्यात आली आहे. काँग्रेसला राज्यात गतवैभव मिळवून देण्याचा आ-पला प्रयत्न असेल. विधानसभा निवडणुकीतील अपयशामुळे खचून न जाता आता रडायचे नाही तर लढायचे आहे, असा स्पष्ट संदेश म हाराष्ट्र काँग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सामान्य कार्यकर्त्यांना दिला.

हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारली. बिर्ला मातोश्री सभागृह येथे आयोजित पदग्रहण सोहळ्यात त्यांनी आपल्या ध्येयधोरणांबाबत पदाधिकारी, कार्यकर्त्यांना माहिती दिली. 'सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल मे है, देखना है जोर कितना बाजू ए कातिल मे है,' अशी सुरुवात करीत त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना उभारी दिली. समाज माध्यमाच्या वापराबरोबरच आता रस्त्यावर उतरून लढावे लागेल. टाकीवर चढून 'शोले' पद्धतीच्या आंदोलनाला यापुढे थारा दिला जाणार नाही, असे बजावताना भाजप सक्षम नसल्यानेच शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांना फोडावे लागले. काँग्रेसमधील नेत्यांना भाजपमध्ये प्रवेश दिला अशी टीकाही त्यांनी केली.



आपल्याकडे सक्षम नेतृत्व आहे, मात्र मागील काळात काही कड्या सुटल्या आहेत. आपल्याला संघटना बांधायची आहे, आपल्याकडे नेतृत्व आहे पण कार्यकर्त्यांची एकएक कडी जोडायची आहे, कार्यकर्ता कार्यकुशल बनवायचा आहे. लढाईतील आयुधे बदलली आहेत, रस्त्यावर उतरून लढावे लागेल. आता रडायचे नाही तर लढायचे दिवस आहेत. आपण पुढील काळात राज्यात काँग्रेसचे संघटन मजबूत करण्यावर भर देणार असून काँग्रेसचा विचार घराघरात पोहचवायचा आहे. पुढील निवडणुकीत राज्यात काँग्रेसची सत्ता आणून काँग्रेसचा मुख्यमंत्री बनवायचा आहे, असा निर्धार हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

यावेळी ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, म ाजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सुशिलकुमार शिंदे, माजी मंत्री अमित देशमुख, वसंत पुरके, नसीम खान, वर्षा गायकवाड यांची या वेळी भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांनी केले.

हर्षवर्धन सपकाळ यांना शुभेच्छा देताना प्रभारी रमेश चेन्निथला यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात मजबूत बनेल, असा विश्वास व्यक्त केला. विधानसभा निवडणूक काळात विरोधकांनी मतांची चोरी करून सरकार बनवले. आता पुन्हा नव्याने पक्ष संघटना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रीत करा, असे आवाहन चेन्निथला यांनी केले.

विजय वडेट्टीवार यांनी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या अपयशावर भाष्य करताना मोदीं-ची लाट असतानाही २०१४ साली ४४ आमदार विधानसभेला निवडून आले होते. मात्र या विधानसभेत काँग्रेसला अपयश आले याचे कारण आपण बेसावध राहिलो. मात्र आता पुन्हा जोमाने काम करावे लागणार असल्याचे सांगितले.

माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेला काँग्रेसला ८०-८५ जागी विजय मिळेल असे चित्र होते पण भाजपाने मतांची चोरी करून सत्ता आणली. काँग्रेसने ईव्हीएमवर आक्षेप घेतला नाही पण मतदान वाढले कसे याचे उत्तर निवडणूक आयोग देऊ शकले नसल्याचे सांगताना त्यांनी निवडणूक प्रक्रियेवर बोट ठेवले.

काँग्रेसचे मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रभारी रमेश चेन्निथला, विजय वडेट्टीवार, मुकूल वासनिक, माणिकराव ठाकरे आदी उपस्थित होते

## संपादकीय....

# धोरणात्मक भागीदारी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून, कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी यांनी भारताचा दौरा केला. यावेळी अमीर यांच्यासोबत त्यांचे मंत्री, अधिकारी आणि उद्योगपतींचा समावेश असलेले उच्चस्तरीय शिष्टमंडळही होते. पंतप्रधान मोदी यांनी १८ फेब्रुवारी रोजी हैदराबाद हाऊस येथे अमीर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी दोन्ही देशांनी 'द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारी स्थापना करारा'वर स्वाक्ष्या केल्या. नव्याने स्थापित झालेल्या धोरणात्मक भागीदारीच्या पार्श्वभूमीवर, दोन्ही देशांनी राजकीय, व्यापार, गुंतवणूक, सुरक्षा, ऊर्जा, संस्कृती, शिक्षण, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि शाश्वतता यासह सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्य करण्याचे मान्य केले. तसेच यावेळी सुधारित दुहेरी कर टाळण्याच्या करारावरही स्वाक्ष्या करण्यात आल्या. भारत आणि कतारमधील पारंपारिक संबंध अधिक दृढ झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी यांनी आज हैदराबाद हाऊस येथे विविध मुद्द्यांवर चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी भारत-कतार संबंधांना व्यापार, ऊर्जा, गुंतवणूक, नवोपक्रम, तंत्रज्ञान, अन्न सुरक्षा आणि संस्कृतीक संबंधांवर लक्ष केंद्रित करून धोरणात्मक भागीदारीमध्ये वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही चर्चा केली.

# रुग्णाचा तारणहार डॉ. प्रतीक शिंगाडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आदर्श गाँव बनगरवाडी ता. माण चे रहिवाशी असलेले डॉ तायाप्पा शिंगाडे हे प्रसिद्ध डॉक्टर आणि समाजसेवी राजकारणी म्हणून ओळख आहे त्यांचे जवळजवळ पन्नास माणसांचे सुशिक्षित व नोकरदार, व्यावसायिक दृष्ट्या सक्षम असे कुटुंब आहे त्यांना रामचंद्र , दादासाहेब विलास, शामराव आणि अशोक ही मुले आहेत. कै.रामचंद्र शिंगाडे हे पोलिस पाटील यांना तीन मुले आहेत. यांची फार इच्छा होती माझ्या वडीलाप्रमाने एक तरी मुलगा डॉक्टर व्हावा परंतु दुर्दैवाने हे होऊ शकले नाही. एक शिक्षक एक अधिकारी तर एक यांचा मुलगा शेती करत आहेत.त्यांचाच एक मा.सरपंच संजय रामचंद्र शिंगाडे हे रास्त भाव दुकानदार आणि प्रगतशील शेतकरी म्हणून प्रसिद्ध आहेत.यांना उच्च शिक्षित दोन मुले एक मुलगा चि प्रतीक हा डॉक्टर तर दुसरा मुलगा चि.ऋतिक फार्मासिस्ट आहे

डॉ प्रतीक चे प्राथमिक शिक्षण गावातील जि. प. प्राथमिक शाळा बनगरवाडी येथे तर माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण ज्ञानवर्धीनी हायस्कूल म्हसवड येथे तर पुढील मेडिकल पदवी डॉ जे जे मगदूम होमेपैंथिक मेडिकल कॉलेज जयसिंगपूर या ठिकाणी प्रथम श्रेणी सह उत्तीर्ण झाला याने आपल्या आजोबांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी जिद्दीने कष्ट घेऊन आज डॉ झाला आणि पणजोबाचा वारसा चालविण्याचे काम केले त्यांना आई वडिलांचे काका चे सर्व भावंडाचे, मित्राचे सहकार्य लाभले आज प्रसिद्ध डॉ पवार सर यांचे पद्मिनी क्लिनिक दिघंची ता. आटपाडी या ठिकाणी व्यवस्थापकीय संचालक म्हणून सराव करत आहे. दिघची हे जवळपास २०००० लोकसंख्येचे गाव असून या गावालगत २० खेडी/ वाड्या असून हा दवाखाना सर्व सोयी सुविधा युक्त असून रुग्णांना बरे वाटेल असे आणि अल्प दरामध्ये सुविधा उपलब्ध करून दिली आहे .डॉ प्रतीक हा एक हुशार आणि शांत संयमी असा मुलगा हा डॉ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे मानत दररोज रुग्णांची उत्तम सेवा करत आहे. आपत्कालीन गरज पडल्यास काही वेळेला रुग्ण पुढील उपचारासाठी तातडीने पंढरपूर सांगली या ठिकाणी हलविण्यात येते तेव्हा डॉ पवार यांची स्वतःची चारचाकी गाडी घेऊन दाखल करतो. डॉ प्रतीक चालक आणि डॉक्टर म्हणून काम पाहतो ही याच्या अंगी असणारी तत्परता दिसून येते . तो रुग्णासाठी एक तारणहार परमेश्वर असा अवलिया आहे. रुग्णांना मोफत सल्ला देणे असो वां सहकार्य करणे रुग्णांकडे पैसा असो वा नसो रुग्ण दाखल करून घेणे ही यांची लखब आहे त्यांच्या या तत्परतेमुळे या दवाखान्यांमध्ये येणारे रुग्ण डॉ प्रतीक यांचे नाव घेत असतात त्यामुळे त्यांनी रुग्णाच्या हृदयामध्ये नाव कोरलेले आहे . त्यांनी भविष्यामध्ये असेच काम करावे त्यांच्या कार्याला सलाम

**– श्री डी. जी बनगर सर**
**बनगरवाडी.**



# नळदुर्ग येथील राज जगदाळे यांची छत्रपती शाहु महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी येथे प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथील जेष्ठ पत्रकार व कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. दिपक तुळशिदास जगदाळे यांचे चिरंजीव राज दिपक जगदाळे यांची महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) येथे प्रकल्प अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. राज दिपक जगदाळे यांच्या यशामागे त्याचे मार्गदर्शक आदरणीय सतीश पाटील लतातताई सतीशराव पाटील, प्रितम पाटील, शुभम सुरवसे व त्यांचे आई वडील यांचा सिंहाचा वाटा आहे. राज दिपक जगदाळे यांनी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे यांचे विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे नुकताच पदभार स्विकारला आहे. या निवडीमुळे सतीश पाटील, लतातताई पाटील, आदीनी अभिनंदन व कौतुक केले आहे .

# ओबीसी विद्यार्थ्यांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजना सुरु करावी, संतोष भोजने यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : सुधाकर रणदिवे, ता.१७ सारथी प्रमाणे महाजोती ने सुद्धा ओबीसी विद्यार्थ्यांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजना सुरू करावी अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष संतोष भोजने यांनी बहुजन कल्याण, दुग्ध व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे साहेब यांच्या कडे निवेदनाद्वारे केली.



ओबीसी समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.महत्त्वाचे म्हणजे जातिनिहाय जनगणना होत नाही.ओबीसी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी आरक्षण नाही.नोकरीत प्रचंड अनुशेष आहे.नॉन क्रिमीलेअर सारखी जाचक अट घातली आहे.मॅट्रिक पुर्व शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात नाही.सारथी आणि बार्टीच्या पी एच डी करणार्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली परंतु ओबीसी विद्यार्थ्यांना आर्थिक तरतूद उपलब्ध नाही.इयता आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती योजना लागू करते.अशीच योजना मराठा, कुणबी व कुणबी मराठा विद्यार्थ्यांना सारथी मार्फत गेले चार वर्षे झाली सुरू आहे परंतु महाजोती मार्फत ओबीसी विद्यार्थ्यांना अशी योजना सुरू करण्यासाठी आर्थिक उपलब्धता नाही हा बहुसंख्य ओबीसी समाजावर मोठा अन्याय आहे.या सर्व अन्यायाची दखल घेऊन ओबीसी कर्मचारी, अधिकारी, विद्यार्थी यांचे विविध प्रलंबित प्रश्न त्वरित सोडवावेत याबद्दल चे निवेदन राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष संतोष भोजने यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष जोतिराम बप्पा कोरे, किसान महासंघाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग लोकरे मनोज माळी कृष्णा जगताप राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष अनिल नाचपल्ले सर यांनी राज्याचे इतर मागास वर्ग बहुजन कल्याण, दुग्ध व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुलजी सावे साहेब यांना मुंबई येथील निवासस्थानी जाऊन दिले.सविस्तर चर्चा करत सावे साहेब यांनीही प्रलंबित प्रश्न त्वरित सोडविण्याचे आश्वासन दिले.

# महाराष्ट्रात दोन लाख बांगलादेशींना भारतीय बनवण्याचा घोटाळा : किरीट सोमय्यांचा दावा

(पान १ वरून..) माध्यमांशी संवाद साधला. जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अर्ज आले आहेत. तपासणी केली असता त्यातील बहुतांश अर्ज बोगस आहेत. त्या प्रकरणात गुन्हा दाखल झाला आहे. आज पोलिसांना काही अतिरिक्त पुरावे दिले आहेत. केवळ आधारकार्डच्या आधारावर जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहे. बोगस कागदपत्रांद्वारे जन्म प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांविरोधात महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस सरकारने मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे. आतापर्यंत आठ पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल झाले असून ३०० हून अधिक आरोपींची चौकशी केली जात आहे, अशी माहिती किरीट सोमय्या यांनी दिली. महाराष्ट्रातील एक मोठा घोटाळा उघडकीस आला. दोन लाख बांगलादेशींना भारतीय बनवण्याचा पर्दाफाश आम्ही केला आहे. उशिरा नोंदणीचे प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ९८ टक्के जन्म प्रमाणपत्रासाठी, तर केवळ दोन टक्के मृत्यू प्रमाणपत्राचे आहेत. जन्म प्रमाणपत्रासाठीच्या ९८ टक्क्यांमध्ये एक टक्का सुद्धा हिंदुंचे अर्ज नाहीत.

# जनता विद्यालयात कोमलवाडी १० वी च्या विद्यार्थ्यांना निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय कोमलवाडी विद्यालयात इयत्ता १० वी मार्च २०२५ च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अमोल नाईक स्कूल कमिटीचे अध्यक्ष शरद घुले, लहानु घुले, सुनील सहाणे, सोमनाथ जाधव व जेष्ठ शिक्षकांनी विद्येचे आराध्य दैवत सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी इयत्ता १० वी च्या निरोपार्थी विद्यार्थांनी विद्यालयाचे सर्व शिक्षक यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन येथोचित सन्मान केला.



समीक्षा सहाणे व सिद्धी वाजे या विद्यार्थ्यांनी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत विद्यालयातील विविध आपले अनुभव कथन करून विद्यालयातील सर्व शिक्षकांनी योग्य पद्धतीने ज्ञानदानाचे कार्य केल्यामुळेच आम्ही या परीक्षेस सामोरे जाण्यासाठी सज्ज व सक्षम झालो आहोत असे मत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कार्य करत असतांना आपले ध्येय निश्चित करा. माणसाला शिक्षणच तारु शकते. म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करून चांगले यश संपादन करावे असे आवाहन श्री. सोमनाथ जाधव यांनी केले.

चांगल्या मित्रांच्या सहवासात रहा म्हणजे आपल्या जीवनावर चांगला परिणाम होईल याविषयी विनोबा भावे म्हणतात की आकाशातून पडणारा पाण्याचा थेंब हातात पडला तर तो पिण्यायोग्य असतो तोच थेंब गटारीत पडला तर पाय धुण्यासारखा नसतो. तोच थेंब कमळाच्या फुलावर पडला तर मोत्यासारखा चमकतो. सिंपल्यावर पडला तर मोती तयार होतो.थेंब तोच परंतु सहवास जसा मिळाला तसा परिणाम त्याच्यावर होत असतो.तेच आपल्या जीवनातही घडत असत.म्हणून आपला मित्र चांगला व सुसंस्कारित असावा असे आवाहन विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक यांनी केले.

स्वप्न विचारांना जन्म देतात विचार कृतींना जन्म देतात आणि कृती जीवनात

## अभ्यासू वृत्ती हेच यशाचे खरे सूत्र : शरद घुले

परिवर्तन घडवून आणतात. हिच शिक्षणाची किमया आहे. म्हणून आपली उन्नती घडवायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही.येणाऱ्या एस.एस.सी बोर्ड परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी यशस्वी व्हा.आणि आपल्या भविष्यासाठी उदात्त असे स्वप्ने बघा. त्यासाठी आपले व्हिजन निश्चित करा.असे आवाहन ज्येष्ठ शिक्षिका मनीषा गोराडे-वारुंगसे यांनी केले. ज्ञान समृद्ध होणे हे विद्यार्थ्याचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी अभ्यासूवृती हेच यशाचे खरे सुत्र आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यासावर आपले लक्ष केंद्रित करावे.आणि या परीक्षेमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उच्चत्तम गुण संपादन करून या विद्यालयाचे नाव रोशन करावे, असे निरोप समारंभ प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून शरद घुले बोलत होते. या प्रसंगी समीक्षा सहाने, सिद्धी वाजे, वैष्णवी भोर, प्रतीक घुले, प्रसाद उगले, केशव वळवी, सौरभ कमानकर, सुदर्शन गांडोळे, सागर बस्ते, स्वाती जोंधळे, चित्रा बाजारे, व सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पुस्तकाचे गाव बनवायला नवेगावबांध ॲनलकी की शासनाचे बॅडलॅक...?

## समाजमनांचा सवाल : वाचन संस्कृतीचे होणार काय ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : अर्जुनीमोरगाव तालुक्यातील पर्यटन स्थळ नवेगावबांधमध्ये तीन वर्षांपूर्वी घोषित 'पुस्तकाचे गाव' वाचकांच्या सेवेत त्वरित उपलब्ध व्हावे, सरकारला शक्य नसल्यास आवश्यक मदत करून आम्हीच पुस्तकाचे गाव प्रत्यक्षात आणू, असा इशारा देण्यात आला आहे. 'नवेगावबांधमधील पुस्तकाचे गाव सरकारी 'कपाटा'तच!' यानंतर समाजमन संतप्त झाले आहे. अजूनही काहीच शासनाकडून झाले नाही. म्हणून समाजमनांचा सवाल एकच पुस्तकाचे गाव बनवायला नवेगावबांध ॲनलकी की शासनाचे बॅडलॅक...?

'राज्य सरकारने केशवसुतांच्या गावाला 'पुस्तकाचे गाव आहे. कुसुमाग्रजांच्या गावाला 'कवितेचे गाव घोषित केले. नवेगावबांधलाही पुस्तकाचे गाव घोषित करण्याचा शासन निर्णय झाला असला तरी तो अडगडळीत पडला आहे. नवेगावबांधचे निसर्ग सौंदर्य साहित्याचा विषय झाला आहे. हे साहित्य कपाटबंद न राहता वाचकांच्या सेवेत हजर व्हावे सरकारने त्वरित पाऊले उचलून ही योजना कार्यान्वित करण्यासाठी मदत करावी', अशी अपेक्षा समाजमन करत आहे.

लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरिता शासनाने पुस्तकाचे गाव ही योजना सुरू केली. यात नवेगावबांधची निवड करण्यात आली. नवेगावबांध हे विविध प्रकारे समृद्ध आहे. हे राष्ट्रीय उद्यान असून अधिक प्रमाणात जैवविविधता पाहायला मिळते. या परिसरातून पद्मश्री मारुती चितमपल्ली यांची लेखणी समृद्ध झाली. या भागाला अधिक समृद्ध करून गेली. अशा ठिकाणी पुस्तकाचे गाव या योजनेंतर्गत पर्यटकांकरिता पुस्तकाचे दालन सुरू होत आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे. यामुळे निश्चितच वाचनाची आवड निर्माण होऊन पर्यटकांना वाचनाची सवय हहोईल' हे प्रत्यक्षात येण्यासाठी सरकारी दिरंगाई दूर होण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. 'पुस्तकाचे गाभाराण्यासाठी दिरंगाईमागचे वास्तव काही तरी वेगळे असावे, दालनेही कायमस्वरुपी मिळणार याविषयी खात्री वाटत नाही'. 'पुस्तकाचे गाव ही संकल्पना चांगली आहे. नवेगावबांध पर्यटनस्थळ परिसरात पाच दालने सुरू

'वाचाल तर वाचाल' ही नुसती घोषणा नाही. आपली संस्कृती, कौटुंबिकता वाचविण्यासाठी ही बाब अतिआवश्यक ठरते. 'एआय'च्या जगात स्वतःचे स्वातंत्र्य जपण्यासाठी वाचणे या अभिक्रियेला पर्याय नाही. सध्याची विविध समाजमाध्यमे व सपक दूरचित्रवाणी यांच्याद्वारे पुरस्कृत निर्बुद्धीकरणाबाबत जागरूक होऊन स्वतःची स्वायत्तता टिकवून आपली संस्कृती जपण्यासाठी वाचण्याच्या प्रक्रियेला डावलून चालणार नाही. त्यासाठी पुस्तकाचे गाव ही संकल्पना अतिशय महत्त्वपूर्ण ठरते, या संकल्पनेची घोषणा होऊन त्याची पूर्तता करण्यासाठी मारुती चितमपल्ली यांच्या लेखनाने व वास्तव्याने पुनीत झालेल्या नवेगावबांधची निवड अगदी योग्यच म्हटली पाहिजे, पण, अजूनही त्याची पूर्तता होत नसेल, तर ही बाब अर्थातच अतिशय लाजीरवाणीच म्हणावी लागेल. आता तरी संबंधित विभागाने याकडे गंभीरतेने लक्ष देऊन त्वरित पुस्तकाचे गाव उभारावे.

मराठी भाषा विभागाच्या अधिकाऱ्यांनी नवेगावबांधला येऊन पाहणी केली. पक्षितज्ज्ञ मारूती चितमपल्ली यांच्यासह निसर्ग पर्यटनाला चालना देणारी पुस्तके असावी, अशी आमची अपेक्षा आहे. ही संकल्पना साकारण्याकरिता आवश्यक मदत द्यायला आम्ही तयार आहोत.

# अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे शाहीर शाहिद खेरटकर यांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोकण/केतन भोज :आपल्या अंगीकृत असंख्य कलागुणांनी गेली २५ वर्षे उत्कृष्ट,बहारदार शाहीरीच्या माध्यमातून रसिक मनाला तृप्त करण्याचे कार्य शाहीर शाहिद खेरटकर करत आले आहेत.त्यांच्या शाहिरीचे वैशिष्ट्य म्हणजे जात,धर्म,पंथ,वर्ण यापलीकडे जाऊन मानवतावाद प्रस्थापित करण्यासाठी त्यांची लेखणी सरसावते आणि त्यांच्या पहाडी आवाजातून लोकांचे प्रबोधन होते.शाहिद खेरटकर यांनी कोकणची लोककला जाखडी (शक्ती – तुरा)मनापासून जोपासली आणि तेच रसिकांचे मनोरंजन आणि प्रबोधन करण्याचे त्यांचे उत्तम साधन बनले.शाहीर स्वतः एक उत्तम कवी,गायक,वक्ते,निवेदक आणि पत्रकार अशा विविध भूमिकेतून समाजात



वावरताना दिसतात.साहित्य क्षेत्रात देखील त्यांनी मजल मारली आहे,त्यांचा प्रकाशित झालेला ललकारी हा कविता संग्रह देखील वाचकांच्या पसंतीस उतरला आहे.

कोकणातील ह्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची दखल घेऊन नुकताच अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने शाहीर शाहिद खेरटकर यांना जगद्गुरु रामनंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज दक्षिणपीठ नाणीज यांच्या शुभहस्ते हस्ते मराठा भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.याप्रसंगी आमदार भास्कर शेठ जाधव,आमदार शेखर निकम, माजी आमदार सदानंद चव्हाण, अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीपदादा जगताप,राष्ट्रीय महिला अध्यक्षा सौ. स्वाती ताई काशिद,राष्ट्रीय कीर्तनकार ह भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाभळे अखिल भारतीय मराठा महासंघाचे रत्नागिरी

## सद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज दक्षिणपीठ नाणीज यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान

जिल्हाध्यक्ष संदीप सावंत यांच्यासहित समस्त नागरिक, श्रोतेजण उपस्थित होते.

अखिल भारतीय मराठा महासंघ १२५ वर्षे पूर्ण करत आहे,त्याच पार्श्वभूमीवर राज्यात अशाप्रकारे धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.याचाच एक भाग म्हणून दोन दिवसीय कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला होता,यानिमित्ताने बहुजन समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या गुणवंतांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.मराठा ही जात नव्हे तर एक विचार आहे.या विचारधारेने चालणारे संघटन म्हणजे अखिल भारतीय मराठा महासंघ होय.

या दोन दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे सूत्रसंचालन देखील शाहीर शाहिद खेरटकर यांनी केले.चिपळूणकर भूमिपुत्र शाहीद खेरटकर यांना प्राप्त झालेल्या पुरस्कार बद्दल त्यांचे अनेक स्तरातून अभिनंदनासहकौतुक होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### भरधाव ट्रकने तिघांना चिरडले; ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा

सोलापूर : हैदराबाद-सोलापूर महामार्गावर भरधाव ट्रक चालवून वेगाने वाहतुकीचे कोणतेही नियम न पाळता बेजबाबदारपणे चालवून अपघात करून तिघांना चिरडले. यात तिघांचा मृत्यू झाला. ही घटना १५ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी वाजीद आरिफ कुरेशी (वय-४९, रा. सरवदे नगर, मुळेगाव रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून सिमेंट ट्रक चालक (एमएच ४४ यू ७४९५) या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, यातील संशयित आरोपी यांनी त्याच्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून बेरजबाबदार पणे चालविली. यात अपघात करून फिर्यादीस व फिर्यादीचा मेव्हणा मजीद चौधरी, बंडोपंत सुरवसे व करीम व्यापारी यांना गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीचा मुलगा तोहीद कुरेशी, आसिफ बागवान व विवेकानंद लिंगराज यांना गंभीर जखमी करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. तसेच फिर्यादीच्या गॅरेजचे व गॅरेजमधील गाड्यांचे नुकसान करून तेथून पळून गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोसई.येळे हे करीत आहेत.

# पंढरपूर येथे नक्शा प्रकल्पाचा शुभारंभ

## पंढरपूर शहरी भागातील सर्व मिळकतींचे ड्रोनद्वारे होणार मोजणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्रशासनामार्फत शहरी भागातील जमिनीची ड्रोनद्वारे मोजणी करुन अद्यावत व अधिक अचूक नकाशे तयार करण्याचा 'नक्शा'(छघडक) उपक्रम सुरु करण्यात येत आहे. त्यात प्रथदर्शी प्रकल्प म्हणून पंढरपूर नगरपालिकेची निवड करण्यात आली असून, नगरपरिषद हद्दीतील सर्व मिळकतींचे सविस्तर नगर भूमापन करुन व चौकशी करुन मिळकतींचे नकाशे व मिळकत पत्रिका या प्रकल्पातंर्गत तयार करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख दादासाहेब घोडके यांनी दिली.



पथदर्शी नक्शा प्रकल्पाचा शुभारंभ आज दि. १८ फेब्रुवारी रोजी योग भवन, पंढरपूर येथे करण्यात आला . यावेळी तहसिलदार सचिन लंगुटे , उप अधीक्षक भूमी अभिलेख पूजा आवताडे, उपमुख्याधिकारी अँड. सुनिल वाळूजकर, नगर अभियंता नेताजी पवार, क्रेडाई अध्यक्ष अमित शिरगावकर, भुमि अभिलेख विभागाचे नवनाथ राऊत, विकास कुमठेकर, शिवदास शितोळे, प्रविण ननवरे, मयुर पुजारी तसेच शहरातील क्रेडाई सदस्य, नगरपरिषद चे सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी, महिला बचत गट, माजी नगरसेवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

यावेळी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख श्री घोडके म्हणाले, पंढरपूर शहरी भागातील जमिन मोजणी करुन मालमत्ता कार्ड देण्याबाबत 'नक्शा'(छघडक) हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्यात १० नगरपालिका क्षेत्रामध्ये हा प्रकल्प पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येत आहे. त्यात आपल्या जिल्ह्यातील पंढरपूर नगरपालिकेचा समावेश आहे. पंढरपूर नगरपालिकेच्या क्षेत्राच्या भागातील मालमत्तांचे ड्रोनद्वारे सर्व्हेक्षण केले जाईल. त्याद्वारे प्रत्येक मालमत्तेचे अचुक नकाशे तयार करुन मालमत्ताधारकास दिले जातील. शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगर रचना विभागाच्या नकाशांशी तसेच भूमि अभिलेख विभागाच्या नकाशांशी एकसूत्रता असणे अत्यंत महत्त्वाचे असून. शहरी भागातील बांधकाम परवाने योग्य पद्धतीने हाताळणे आणि मिळकत कराची योग्य आकारणी करण्यासाठी, ड्रोन सर्व्हे सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागेचा अचूक आणि भूसंदर्भीय नकाशा तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उप अधीक्षक भूमी अभिलेख पूजा आवताडे म्हणाल्या, ड्रोनद्वारे तयार केलेल्या नकाशाच्या आधारे पंढरपूर शहरात सद्यस्थितीत नोंदीत मालमत्तांची पडताळणी व नव्याने निर्दशनास आलेल्या मालमत्तांची मालमत्ता कर रजिस्टर मध्ये नोंद होऊन पालिकेचे उत्पन्न वाढेल. तसेच मालमत्ताधारकाचे अचुक क्षेत्र त्यास मोजणी करुन मिळेल. शहरात विविध विकासकामे राबवितांना जमिन मोजणी ही अचुक होईल.




त्यांचे मालकी पत्र जमिन मालकास मिळेल. तसेच शहरातील जमिनीचे वर्गिकरण करणे व त्याचे क्षेत्र निश्चिती करणे सुलभ होईल. नागरिकांच्या नागरी हक्कांचे संरक्षण होईल, मिळकतीबाबतचे न्यायालयीन दावे कमी होण्यास मदत होईल. सदर कार्यक्रम नगर विकास विभाग, भूमि अभिलेख विभाग व भारतीय सर्वेक्षण विभाग, डेहराडून यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कठोर मेहनत व प्रचंड अभ्यास केल्याशिवाय पर्याय नाही : प्रा शिवराज मोटेगावकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर : सुधाकर रणदिवे, रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर येथे वार्षिक स्नेह संमेलन पार पडले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष रेणुका एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. मीनल शिवराज मोटेगावकर ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून रेणुका एज्युकेशन सोसायटी चे सचिव व आर सी सी क्लासेस चे संचालक प्रा शिवराज मोटेगावकर, डाएट मुरुड च्या प्राचार्या डॉ भागीरथी गिरी, शंकरराव गुट्टे वरिष्ठ महाविद्यालय धर्मापुरी येथील प्रा.डॉ पांडुरंग मामडगे हे उपस्थिती होते. या वेळी व्यासपीठावर रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन चे प्राचार्य डॉ. कैलास मोटे, रेणुका अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य शशिकांत चिल्लगे, प्रा माने डाएट मुरुड यांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कठोर परिश्रम आणि



अभ्यास केल्याशिवाय पर्याय नाही व स्पर्धेत टिकायचे असेल तर सतत स्वतः ला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी बोलताना व्यक्त केले.या वेळी छात्र अध्यापकानी वैयक्तिक नृत्य,सामूहिक नृत्य, नाटक,फॅन्सी ड्रेस स्पर्धा , मिमिक्री,इ स्पर्धकांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापक प्रदिप अडसुळे व छात्र अध्यापिका अफरोज देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ हिरकण शेटकर यांनी केले .या वेळी प्रा.रतन लहाने, प्रा. उमेश रणदिवे, प्रा.उत्तम दुधभाते,प्रा रमाकांत गायकवाड, राधिका माने, ग्रंथपाल मनिषा लातूरकर,प्रा. अंकुश भगवान, अजय बद्दर बी एड जी.एस गणेश मालेगावकर बी.एड व डी. एल एड व एल .आर , सी आर व बी एड , डी. एल एड चे सर्व छात्र अध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्ता चादरे व बी एड व डी.एल एड च्या सर्व छात्र अध्यापकानी सहकार्य केले.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी सोन्याच्या पानाची माळ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस मीना राजेंद्र पाटील या भाविकांने सोन्याच्या पानाची माळ अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी श्रींची प्रतिमा, दैनंदिनी, दिनदर्शिका व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते.

सदर भाविक बलई ता. उरड (जि. रायगड) येथील रहिवाशी असून त्यांनी कै. शांताबाई पांडुरंग पाटील यांच्या स्मरणार्थ सोने पानाची माळ (लाल खडा व रेशीम गोंड्यासह) अर्पण असून, त्याची अंदाजे किंमत १ लाख ७८ हजार होत आहे.

# डुबेरे केंद्राची एस.एस.सी परीक्षेची आसन व्यवस्था

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डुबेरे ता - सिन्नर जि.नाशिक या विद्यालयात एस.एस. सी.परीक्षेसाठीची केंद्र आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे.

डुबेरे केंद्र क्रमांक १५८५ असून दि. २१ फेब्रुवारी - २०२५ पासून सुरू होणाऱ्या परीक्षेसाठी एकूण ३६१ विद्यार्थी प्रविष्ट असून एकूण १५ वर्गखोल्या नियोजत आहे. बैठक क्रमांक - ऊ ८७९१३ ते ऊ ४००१६२ अशी आसनव्यवस्था सर्व विषयासाठी करण्यात आली आहे.

केंद्र संचालक म्हणून डुबेरे हायस्कूलचे मुख्याध्यापक रामदास वाजे , उपकेंद्र संचालक म्हणून सुनिल खैरनार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या केंद्रात डुबेरे,गोंदे , मनेगाव ,रामनगर व पाटोळे या संबंधित संलग्न शाळेतील परीक्षार्थींचा समावेश या केंद्रात आहे.

परीक्षा सुरू होण्यापूर्वी वेळेत परीक्षा केंद्रात हजर रहावे. सोबत फक्त लेखन साहित्य व पाणी बॉटल आणावे. सोबत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आव्हान केंद्र संचालक रामदास वाजे, उपकेंद्र संचालक सुनिल खैरनार ,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत यांनी केले आहे.

# ईटकुरमध्ये भरला बाल गोपाळासह पालकांचा मेळावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इटकुर : सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील ईटकुर येथे एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत दिनांक १४ वार शनिवार रोजी अंगणवाडी पर्यविक्षिका संगीता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.यात एक ते तीन वयोगटातील बालकांच्या पालकांना बालकाचे आरोग्य, बौद्धिक, शारीरिक विकास,सामाजिक वातावरण या सर्वांगीन विकासाबाबत पालकांनी लहान मुलांचे संगोपण कसे करावे या वर मार्गदर्शन आपल्या कृतीतुन पर्यविक्षिका संगीता सावंत यांनी केले.

विठ्ठल रुक्माई मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याच्या अध्यक्षांनी जि.प.प्रशाला केंद्रीय शाळेच्या मुख्याद्यापिका शारदा मुंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून अंगणवाडी पर्यवेक्षिका आगलावे, तुकाराम शिंदेभारत गुढे,पोलीस पाटील सोमनाथ जगताप उपस्थित होते. यावेळी पोषण आहार,शरीर वर्धक ऊर्जावर्धक, संरक्षणात्मक भविष्याचे झाड,वैज्ञानिक दृष्टिकोन, बालकांच्या भविष्याचे झाड अशी अनेक सादरीकरणाचे स्टॉल अंगणवाडी सेविका यांनी थाटली होती निरीक्षणातून बदल या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गायत्री क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले.यावेळी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्व अंगणवाडी सेविका, मदतीस यांचे सहकार्य लाभले.

**पंढरपूर पंचक्रोशीत हा उपक्रम मात्र चांगलाच चर्चेचा ठरला** — **१०० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग**

# स्वेरीतील 'मेसा'च्या विद्यार्थ्यांकडून 'आपुलकी' कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मातोश्री वृद्धाश्रमासाठी एक प्रकारची ऊर्जा देणारा ठरावा असा उपक्रम स्वेरीतील मेसाच्या विद्यार्थ्यांकडून नुकताच आयोजित करण्यात आला. स्वेरीतील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी गोपाळपूर मधील श्री. संत तनपुरे महाराज संचलित मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देऊन काही काळ तेथील वृद्ध आजी आजोबांसोबत घालवला. मेसातील विद्यार्थ्यांनी 'आपुलकी' या कार्यक्रमाच्या अंतर्गत वृद्धांसोबत प्रेम व आपुलकीची देवाण घेवाण करून एक दिवस उत्साहवर्धक रीतीने घालविला. पंढरपूर पंचक्रोशीत हा उपक्रम मात्र चांगलाच चर्चेचा ठरला !




स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये केवळ पुस्तकी ज्ञान न देता महाविद्यालयातून शैक्षणिक, क्रीडा, विधायक व सामाजिक अशा विविध विषयावर संस्कार दिले जातात. त्याचाच एक भाग म्हणून स्वेरीतील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील 'मेसा' तथा मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडन्ट असोसिएशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देवून तेथे सकारात्मक असे कार्य केले. प्रारंभी मेसाचे समन्वयक प्रा. एस. एन. मोरे यांनी मातोश्री वृद्धाश्रमामध्ये येण्याचे प्रयोजन सांगितले. वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक धनंजय राक्षे यांनी स्वेरीतील सर्व सहकार्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. एन. यु. कौटकर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उपयोगी व प्रेरणादायी कार्य करण्यासाठी प्रेरित केले. वृद्धाश्रमाचे अधिकारी श्रीकांत देशपांडे व सुनंदा छत्रे यांनी वृद्धाश्रमाबाबत व तेथील कार्याबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी मेसातील विद्यार्थ्यांकडून वृद्ध आजी आजोबांसाठी गरमागरम नाष्ट्याची सोय करण्यात आली होती. सोबतच सफरचंद, केळी, लाडू आदी खाद्यपदार्थांचे वाटप देखील करण्यात आले. यावेळी वृद्ध महिला व आजोबा मंडळी यांनी विद्यार्थ्यांची आपुलकीने विचारपूस केली. वृद्धांनी मायेने विद्यार्थ्यांच्या अंगाखांदयावरून हात फिरवला. साधारणपणे दोन तास त्यांच्यासोबत राहिल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचा निरोप घेतला. एकूणच विद्यार्थी आणि वृद्धाश्रमातील नागरिकांची अविस्मरणीय अशी भेट झाली. या कार्यक्रमात आदित्य चोरमले, प्रणव पाटील, प्रियांका सोनवणे, संस्कृती मोरे, प्रतिक येडवे, प्रतीक्षा चौधरी, ज्ञानेश्वरी मिटकरी, मानसी कंदी यांच्यासहित जवळपास १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चांगले कार्य केल्याबद्धल स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी मेसमधील विद्यार्थ्यांची पाठ थोपटली. 'आपुलकी' चा हा कार्यक्रम उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली व विभागप्रमुख डॉ. एस. बी. भोसले, प्रा. एस. एम. वसेकर यांच्यासह इतर शिक्षकांच्या सहकार्याने संपन्न झाला. प्रताप लवळे व प्रणव पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थी प्रतिनिधी देवांश खरे यांनी आभार मानले.

# एकंबी वाडी जिल्हा परीषद शाळेत स्नेहसंमेहन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यातील एकंबी वाडी येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेत दरवर्षी स्नेहसंमेलन साजरा केला जातो ,याही वर्षी स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याचे सादरीकरण करुन उपस्थीतांची मने जिंकली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर, लोकनाट्य भारुडे, गवळणी, भक्तीगीत आदी गीतावर विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुनानुसार नृत्याचे सादरीकरण केले, यावेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे उपस्थीत मान्यवरांनी कार्यक्रम पाहुन भरभरुन कौतुक केले. जिल्हा परीषद एकंबी वाडी शाळेत विवीध महापुरुषांच्या जयंत्या व पुन्यतिथी सह पारंपारीक सण साजरे साजरे केले जातात. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच चंद्रकांत लांडगे ,मा.सरपंच जीवन चव्हाण .हेड आयईसी यूएनडीपी संयुक्त राष्ट्रसंघ दिल्लीचे औदुंबर चव्हाण, औसा गट विकास अधिकारी युवराज मेहत्रे, गटशिक्षणाधिकारी गोविंद राठोड, केंद्रप्रमुख नीलिमा डोके, केंद्रीय मुख्याध्यापक महादेव गरड, उपसरपंच बाळासाहेब सूर्यवंशी, औसा शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे, व्हाईस चेअरमन हरीश अयतनबोणे, सचिव संजय जगताप, प्रवेश समुपदेशन सोमनाथ लांडगे, एक्साईज कॉन्सटेबल विकास वडमीले, ग्रामपंचायत सदस्य लहु सगर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन इंगळे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एकंबीवाडी चे मुख्याध्यापक गुणवंत साळुंके, सांस्कृतिक विभाग प्रमुख कोमल ढवळे,सह एकंबीवाडी गावातील ग्रामस्थ उपस्थीत होते.

**एकंबीवाडी जिल्हापरीषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाला भरभरुन प्रतिसाद गावकर्याकडुन तब्बल ३५००० हजार रुपयांच्या बक्षीसाचा वर्षाव**



## थोडक्यात...




### पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण; पतीसह पाच जणांवर गुन्हा

सोलापूर : लग्नात तुझ्या आई-वडिलांनी मान पान केला नाही व जावयाला सोने घातले नाही माहेरून दहा तोडे सोने घेऊन ये असे म्हणून पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी सानिया अ.वाजिद काझी (वय-२७,रा.हिमायत बाग,सिडको,छत्रपती संभाजी नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती अब्दुल काझी,सासू निईमा काझी, सासरे तौफिक काझी,नणंद लबना मोमीन,दिर मोमीन काझी (सर्व.रा.हिमायत बाग,सिडको छत्रपती संभाजीनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २० मे २०१८ ते २० जुलै २०२४ रोजी पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी संभाजीनगर येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यांची एमकेसीएल यांच्या वतीने स्वच्छता अभियान

## महाराष्ट्रात सर्वांत मोठा आसलेल्या किल्ल्याला घुसीने पोखरले; पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष, पर्यटकांनीही फिरवली पाठ

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडे : यूनिटी मल्टीकॉन्स कंपनीचे टेंडर बंद झाल्या पासुन किल्लयाकडे प्रशासनाचे चक्क दुर्लक्ष झाले आहे अक्षरशः किल्यातील हुलमुख दरवाजाच्या बाजुला घुसीने पोखरले आसुन ज्या ठिकाणी घुसीने पोखरले आहे त्या ठिकाणी मातीचा ठीगारा देसुन येत आहे.

ठिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग लागले आहेत नळदुर्ग शहरातला महाराष्ट्रात सर्वांत मोठा किल्ला म्हणून ओळखला जातो हा ऐतिहासिक किल्ला पाहाण्यासाठी दर वर्षी लाखों पर्यटक येतात परंतू या वर्षी पर्यटनानी सुद्धा किल्लयाकडे पाठ फिरवल्याचे दिसुन येत आहे .

कारण किल्यामध्ये यूनिटी मल्टीकॉन्स कंपनीचे कार्यकारी संचालक कपील मौलवी यांनी खुप चांगल्या पद्धतीने किल्लयाचे संवर्धन व्यवस्थापन केले होते ती परिस्थिती आज राहीलेली नाही किल्लयात पाणी महाल, उपली बरुज, नवबुरून , हुलमुख दरवाजा , बारादरी, मुन्सीफ कोर्ट आदी





ठिकानी कचरा दिसुन येत होता किल्लयाचे संवर्धन व्हावे तात्काळ बि ओ टी तत्वावर देण्यात यावा आशा प्रकारची मागणी पर्यटक करत आहेत तरच किल्ला स्वच्छ व सुंदर राहील किल्लयाच्या कडेवर उगवलेले गवत कचरा गोळा करत साफसफाई करण्यात आली एका पोत्यात भरून कचर कुंडीत जमा करण्यात आला किल्ला स्वच्छ करण्यात आला आपल्या नळदुर्गच्या ऐतिहासिकदृष्ट्या किल्ला खुप महत्वाचा आसुन इतिहासाची माहिती मिळावी किल्लयाचे संवर्धन व्हावे किल्लाची. जबाबदारी त्यांना कळावी अशा उद्देशाने हा स्वच्छता अभियान राबविण्यात आले

या उपक्रमास शिवम् कम्प्युटर एज्युकेशन नळदुर्ग मधील सतीश पुदाले पूनम बिसेनी, सानिका महाबोले, प्रज्ञा मूर्टेकर , बेले अदिती भागवत, गायकवाड तृप्ती मल्लिकार्जुन, चव्हाण आकांक्षा अवधूत, सुरवसे ऐश्वर्या सुधीर, भोसले प्रणिता संदिपान, सुरवसे पंकज नागनाथ, टकले दीपक शरण इब्राम पूर, गायकवाड सुरज अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला आहे धाराशिव जिल्ह्यातील आणखीन श्री साई कॉम्प्युटर,हरी इन्फोटेक उमरगा, समर्थ कम्प्युटर सेंटर बलसुर, समर्थ कम्प्युटर सेंटर नळदुर्ग, सुपर कम्प्युटर्स अणदूर, विशाल कम्प्युटर येणेगुर, अभिनव कम्प्युटर्स उपळे, राजीव कम्प्युटर्स, अष्टभुजा स्किल तुळजापूर, श्री समर्थ कम्प्युटर तुळजापूर, ग्लोबल इन्फोटेक जे. बी. कम्प्युटर तुळजापूर, आदी सेंटरच्या विद्यार्थी या स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते

किल्ले स्वच्छता अभियानामध्ये शिवम् कॉम्प्युटर एज्युकेशनचे सतीश पूदाले यांनी खूप चांगल्या पद्धतीने स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या विद्यार्थांची व्यवस्था केली होती. आलेल्या विद्यार्थ्यांना दुपारचे भोजनदान देण्यात आले, यामध्ये नळदुर्ग नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष लक्ष्मण कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यानी सहभाग नोंदवला

**छत्रपती शाहू महाराज संशोधन व मानव विकास संस्था (सारथी) पुणे व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित एम के सी एल यांच्या संयुक्त विद्यमाने आणि एम के सी एल जिल्हा समन्वयक धनंजय जवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या शिवजयंतीच्या निमित्ताने नळदुर्ग येथील किल्लयाची स्वच्छता करण्याचा मानस एम के सी एल होता याच अनुषंगाने या उपक्रमांमध्ये जिल्हाभरातील जवळपास २० संगणक प्रशिक्षण केंद्राचे २५० विद्यार्थी या अभियानामध्ये सहभागी झाले होते.**

# विठ्ठल प्रतिष्ठानच्या वतीने तीन दिवसीय व्याख्यानमाला यशस्वी संपन्न

## आमदार अभिजीत पाटलांनी राखली परंपरा कायम शिवतीर्थावर यशस्वी व्याख्यानमालेचे आयोजन केले










**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून पंढरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित तीन दिवसीय शिवव्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानमालेमध्ये पहिल्या दिवशीचे व्याख्यान प्रा.गणेश शिंदे, दुसऱ्या दिवशी युवा व्याख्याते राहुल गिरी आणि तिसर्या दिवशी छत्रपती शिवरायांचा ज्वलंत इतिहास मांडणारे शाहीर डॉ. देवानंद माळी यांनी आपल्या शाहीरीतून महाराजांचा जीवनपट मांडला,असे हे विविध कार्यक्रम मोठ्या थाटामाटात संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी माढा आमदार अभिजीत आबा पाटील, उद्योगपती श्री.सी.पी.आणणा बागल, भैरवनाथ शुगरचे श्री.अनिल सावंत, पंढरपूरगटशिक्षणाधिकारी मारुती लिंगाडे, मध्यवर्ती शिवजन्मोत्सव अध्यक्ष नागेश जाधव, मा.नगराध्यक्ष सुभाष

### पंढरपूरकरांनी दिला भरभरून प्रतिसाद

भोसले, संभाजी ब्रिगेडचे काशीद रावसाहेब, दिनकर चव्हाण, धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, राष्ट्रवादीचे शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा संघटक सुधीर भोसले, नगरसेवक प्रशांत शिंदे, नगरसेवक धनंजय कोताळकर, नगरसेवक श्रीनिवास बोरगांवकर, नगरसेवक किरण घाडगे,श्री.अदित्य फत्तेपुरकर, नगरसेवक सतिश शिंदे, तालुकाध्यक्ष संदीप मांडवे, कॉग्रेसचे शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी, समाजसेवक अरुण कोळी, अमित पवार, संतोष सर्वगोड तसेच इतर मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निफाड येथे श्री संत नरहरी महाराज पुण्यतिथी साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांची ७३९ वी पुण्यतिथी सोहळा निफाड येथे शनिमंदीर चौकात भक्ती भावाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.




या प्रसंगी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन योजन करण्यात आले होते.

शनिवार दि १५ / २/ २०२५ रोजी सकाळी ८:३० वाजता श्री शनिमंदीर येथे श्री शैनेश्वरांची महाआरती करुन संत शिरोमणी नरहरी महाराज यांचे श्रध्दापुर्वक प्रतिमा पूजन करण्यात आले, असून उपस्थित भाविक भक्तांना सोनार समाज बांधवांच्या वतीने खिचडी महाप्रसादाचे वाटप.करण्यात आले. या वेळी सोनार समाज बांधव, महीला भगिनी, बाल गोपाल, मोठ्या संख्येने उपस्थित होते, या प्रसंगी अनेकमान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.या वेळी तुषार अदापुरे, गणेश नागरे, राजाभाऊ नागरे, किरण जाधव, अमोल जाधव, आबा दाभाडे, उमेश आहेराव, राजेंद्र जाधव, सुनिल जडे,गोरख बागुल, मनोज आहेरराव, राहुल नागरे, भुषण आहेरराव, उध्दव नागरे, प्रदीप नागरे, ओम लोळगे, सचिन अधपुरे, आदी सोनार समाज बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरी ई-क्लब कडून एफपीएआय सोलापूर शाखेस पाणी टाकी भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईट यांच्या वतीने फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेला १००० लिटर साठवण क्षमता असलेली पाणी टाकी भेट देण्यात आली. या कार्यक्रमाच्या उद्घाटना प्रसंगी रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईटचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, विन्स डायरेक्टर अजय डोईजोडे, संदीप कुलकर्णी, व्यंकटेश सोमानी, राहुल डांगरे, बाल मुकुंदराठी, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी. तेली, वाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा




रंगरेज, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना अजय डोईजोडे म्हणाले की, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या सेवा घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासू नये, पाण्याविना कोणताही त्रास होऊ नये व मुबलक पाणी मिळावे यासाठी पाण्याच्या टाकीसह बोर मारून देण्यात ही येईल. समाजातील तळागाळातील बालकांना, मुलांना, महिलांना आरोग्याच्या सेवा देताना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नयेत यासाठी रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट तत्पर असेल.

सत्काराला उत्तर देताना रोटरी ई क्लबचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल म्हणाले की, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेत मोफत बेसिक कॉम्प्युटर शिकण्यासाठी येणाऱ्या मुलांना रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईटच्या वतीने स्टेशनरी साहित्य व उन्हाळी टोप्यांचे वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले आहे याचा पूर्ती सोहळा अवघ्या काही दिवसात घेण्यात येईल. प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार वीरेंद्र परदेशी यांनी मानले.

**जिल्हा मेळाव्याचा समारोप**

**पारितोषिक वितरण समारंभ खासदार भास्कर भगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न**

# जबाबदार नागरिक घडविण्यासाठी स्काऊट-गाईडचे योगदान : खासदार भास्कर भगरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : स्काउट गाईड शिक्षण पद्धतीतून जबाबदार नागरिकत्वाची जडणघडण होते. स्वावलंबी जीवनाची पायाभरणी देखील होते. निसर्गाशी नाते जोडण्याचा संस्कार विद्यार्थ्यांत रुजविला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रगती साधली गेली असली तरी पर्यावरणाचे संतुलन मात्र बिघडल्याने माणसापुढे असंख्य समस्या निर्माण होत आहेत. म्हणून निसर्गस्नेही जीवनाचे धडे देणाऱ्या स्काऊट गाईड शिक्षणाचे महत्व आणखी वाढले आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वात निसर्ग, पर्यावरणाचे जतन करणा-या जबाबदारीच्या जाणीवेची रुजवणूक करून निसर्गस्नेही नागरिक घडविण्यासाठी स्काऊट-गाईडने अधिक योगदान देण्याची गरज




असल्याचे प्रतिपादन दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांनी केले.

नाशिक भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संस्था आणि शिक्षण विभागाच्या विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, काकासाहेबनगर आणि स्व. अशोकराव बनकर सहकारी पतसंस्था, पिंपळगाव बसवंत संचलित कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना, काकासाहेब नगर, रानवड, ता. निफाड कार्यस्थळावर दि.६ ते ९ फेब्रुवारी या कालावाधीत स्काऊट-गाईड जिल्हा मेळावा पार पडला. जिल्हाभरातून ८८४ स्काऊट-गाईडचा सहभाग असलेल्या या जिल्हा मेळाव्याचा समारोप आणि पारितोषिक वितरण समारंभ खासदार भास्कर भगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी पार पडला.याप्रसंगी भगरे बोलत होते. याप्रसंगी स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्या शाळांतील स्काऊट आणि गाईडच्या संघांना खासदार भास्कर भगरे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. नाशिक भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संस्था चिटणीस तथा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी निलेश पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या समारोप आणि पारितोषिक वितरण समारंभास के.के. वाघ शिक्षण संस्थेच्या विश्वस्त शकुंतला वाघ, मविप्र सरचिटणीस आड नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, रामदास वाढवणे, बाळासाहेब वाघ, संजय कापसे, आर.डी. जाधव, विलास जाधव, अरुण वाघ, संजय वाढवणे, बाबाजी कुशारे,पोपटराव पाटील, प्रकाश वाढवणे, प्राचार्य गोविंद कुशारे, भीमराज काळे आदी मान्यवर उपस्थित होते. निलेश पाटोळे, शकुंतला वाघ, आड नितीन ठाकरे आदींनी मनोगत व्यक्त केले. जिल्हा संघटक कविता वाघ यांनी प्रास्ताविक तर श्रीनिवास मुरकुटे यांनी उपस्थितांचे आभार मानले. केले.

छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, काकासाहेबनगर शाळा आणि रानवड, सावरगाव ग्रामस्थांनी या जिल्हा मेळाव्यात सहभागी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना भोजन दिले. या जिल्हा मेळाव्यात शारीरिक कसरत, शोभा यात्रा, तंबू सजावट, फूड प्लाझा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पायोनियरिंग प्रोजेक्ट अशा विविध स्पर्धा पार पडल्या. प्रवीण जोंधळे, करुणा गायकवाड (नाशिक), सतीलाल पाटील, संकेत माळी (नंदुरबार), चैत्राम निकम, रवींद्र भामरे (धुळे) यांनी विविध स्पर्धांचे परीक्षण केले. निफाडचे आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते आणि के.के.वाघ शिक्षण संस्था संचालक अजिंक्य वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत या जिल्हा मेळाव्याचे उद्घाटन पार पडले. नाशिकच्या व्ही. एन.नाईक.ज्युनियर कॉलेच्या पायल खोडे या रेंजरच्या नेतृत्वाखालील स्काऊट-गाईड पथकाने संचलनाद्वारे मानवंदना दिली. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर यांच्या हस्ते शोभा यात्रेचे उद्घाटन झाले. ध्वजावतरणाने या मेळाव्याचा समारोप झाला.

**जनरल चॅम्पियनशिप विजेत्या शाळा- स्काऊट विभाग शहरी गट- पेठे विद्यालय, नाशिक स्काऊट विभाग ग्रामीण गट- गोदावरी माध्यमिक विद्यालय, शिंगवे, ता. निफाड गाईड विभाग शहरी गट- मा. रा. सारडा कन्या विद्यालय, नाशिक गाईड विभाग ग्रामीण गट-गोदावरी माध्यमिक विद्यालय, शिंगवे, ता. निफाड.**